सं.फौ.ख.क्र. २२६/२०२५
CNR No.MHYA220003822025

अपराध क्र. ७८/२०२५
शासन –वि– प्रविण
नि.क्र. १० सलग

## न्यायनिर्णय

( दि. ०५ मे, २०२६ रोजी घोषीत )

अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. कपूर तसेच बचाव पक्षातर्फे विद्वान वकील श्री. डि. व्ही. काटकर यांचा युक्तीवाद ऐकला.

२. अभियोग पक्षाचे असे म्हणणे आहे की, दि. ०९.०६.२०२५ रोजी मौजा निंबादेवी येथे गेलो असता, आरोपी हा तेथे घरी हजर मिळुन आला. तेथे आरोपीला दारूबंदी कायद्याखालील उद्देश समजावून त्याचे पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीची झडती घेतली व विचारपूस केली असता, त्यावेळी त्याचे ताब्यात १८० मिलीच्या ३२ शिश्या रु. २२४०/– तसेच एक प्लास्टीक मग्गा व दोन काचेचे ग्लास दारु वासाचे किं. १००/– रु. असा एकूण २३४०/– रूपयाचा मुद्देमाल विनापरवाना अवैधरीत्या बाळगुन असताना मिळून आला. त्यामुळे आरोपीविरुध्द दि. २९.०७.२०२५ रोजी तपासाअंती कलम ६५ (ई) मदाका अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

३. अभियोग पक्षातर्फे दोन पंच साक्षदार तपासले. त्याच्या बयानात आरोपीविरुद्ध कोणताही पुरावा आला नाही. रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर नाही. त्यामुळे दि. १७.०४.२०२६ रोजी न्यायालयाने नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आला नाही. त्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिते चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविला नाही.

४. उभयपक्षाच्या विरोधी कथनावरुन न्यायालयासमक्ष खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निर्णय सकारण खालीलप्रमाणे देण्यात येतात.

| अ.क्र. | मुद्दे | | निर्वाळा |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, आरोपी हा विना परवाना अवैधरीत्या देशी दारु बाळगून असतांना मिळून आला ? | ... | नाही. |
| २. | आदेश काय ? | ... | आरोपी निर्दोष. |

## कारणमिमांसा

५. सदर प्रकरणात अभियोग पक्षाने दोन पंच साक्षीदार **बंडु नारायण आत्राम व रुपेश नारायण टोटावार** यांना तपासले.

६. सदर साक्षदारांच्या पुराव्यावरुन, दि. ०९.०६.२०२५ रोजी पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून कोणताही मुद्देमाल जप्त केल्याचे दिसत नाही. सदर साक्षीदारांनी जप्ती पंचनाम्यावरील फक्त त्याची सही ओळखली. त्याला घटनेसंबंधाने काहीही माहीत नाही, असे सांगितले. विद्वान सहा.सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदाराला बरेच सूचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षाची बाजू बळकट होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर आला नाही. शिवाय अभियोग पक्षाने सदर प्रकरणात रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल केला नाही. अशा परिस्थितीत आरोपीच्या ताब्यातून कोणता मुद्देमाल जप्त केला होता, हे पुराव्याअभावी सिध्द होऊ शकले नाही. तसेच रासायनिक परिक्षणाचा अहवाल अभिलेखावर दाखल नसल्याने जप्त मुद्देमाल हा मादक द्रव्य दारुच आहे, हे सिध्द होवू शकले नाही. अशाप्रकारे अभियोग पक्षाने आपली बाजू संशयापलिकडे सिध्द केली नाही. त्यामुळे आरोपीवर ठेवलेले कलम ६५(ई) चे दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवितो.

७. प्रभारी अधिकारी, **राज्य उत्पादन शुल्क, पांढरकवडा** यांनी सदर गुन्हयात जप्त केलेला मुद्देमाल न्यायालयात दाखल केला नाही. शेवटी मुद्दा क्र.२ ला उत्तर देतांना खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

१) भारतीय नागरिक सुरक्षा संहीतेचे कलम २७८(१), नुसार आरोपी **प्रविण गणपत सिडाम, वय ४९ वर्षे, रा. निंबादेवी, ता. झरी, जि. यवतमाळ** याची महाराष्ट्र प्रतिबंधक अधिनियम कलम ६५(ई) च्या दोषारोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचा जात मुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येते.

३) प्रभारी अधिकारी, **राज्य उत्पादन शुल्क पांढरकवडा** यांना निर्देश देण्यात येते की, सदर गुन्हयात जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर किंवा अपील दाखल न झाल्यास कायदेशीर मार्गाने विल्हेवाट लावावा.

४) आरोपीस निर्देशीत करण्यात येते की, त्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे बंधपत्र द्यावेत व सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्याकरीता वैध राहील.

SUDAM SHRIRAM KALE
Digitally signed by SUDAM SHRIRAM KALE
Date: 2026.05.05 11:15:07 +0530

झरी-जामणी
मे ०५, २०२६

( एस. एस. काळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
झरी जामणी, जि. यवतमाळ

| | |
|---|---|
| “CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER.” | |
| | A. R. Bhoyar<br>NAME OF THE Stenographer |
| Name of the Judge | Shri. S. S. Kale |
| Date of pronouncement of order | 05/05/2026 |
| Order signed by P.O. on | 05/05/2026 |
| Order uploaded on | 05/05/2026 |